# संपर्क
मार्च, २०१२ (वर्ष ७ वे - अंक ५ वा )

संपादक मंडळ

मुख्य संपादक :
श्री. जयवंत हनुमंत भोपटकर
पुणे. ९८९०६७४३४८

उपसंपादकः
श्री. अनिल सरदेसाई
डोंबिवली ०२५१-२८६०२६९

प्रतिनिधी :
श्री. हेमंत पुराणिक, पुणे : ९९२३६१०१९४

सहाय्यक :
श्री. प्रदीप पुराणिक, बेळगाव
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२-२५२४२७०६
सौ. सुषमा करकरे, ठाणे : ०२२-२५३६८७२४
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७-२६०१४५७
प्रा. शिरीष दिलीप फडणीस, सातारा : ९८९००४००२६
श्री. मधुसूदन वा. देसाई, रत्नागिरी : ०२३५२-२२३४४१
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली
श्री. नरेंद्र पानवठकर, बडोदे : ९२२७१३५७९४
श्री. भोपाळ भाटवडेकर : पुणे कार्यवाह ९८५०९७९७०६

इतर संस्थांनी आपापल्या प्रतिनिधी /
सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.

नियतकालिकाचे नावः 'संपर्क'
पत्ता : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, द्वारा -
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद'
अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०
संपादक : श्री. जयवंत भोपटकर
मुद्रक : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
१७/४, 'बसेरा', मधुसंचय सोसायटी, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२

## अनुक्रम

## कागदोपत्री

आपले दि. १.१०.११ चे ‘संपर्क’ नियतकालिक वाचले. त्या अनुषंगाने पुढील अंकासाठी काही विशेष माहिती देण्यासाठी हा प्रपंच.

आजच्या फास्टफूडच्या व कॉम्प्युटरच्या युगात आपण ६० वर्ष उलटलेले ज्येष्ठ नागरिक वावरतो. काही विचार पटतात न पटतात तरी मोठ्या मनाने सहनशीलता बाळगून त्यांच्याशी सहमत होऊन संसारात, जगात वावरत असतो. तडजोड हा फार मोठा व महत्त्वाचा विचार सध्या आपण करायला हवा व त्याप्रमाणे सर्वांशी मिळून-मिसळून घ्यायला पाहिजे असे आहे. मी तर पुढे जाऊन असे म्हणेन की, आपण म्हाताऱ्या माणसांनीच सर्व तरुणपिढीला समजून घेऊन तसे वागायला पाहिजे. तरच आपल्या सारख्यांचा निभाव लागेल आणि त्यात जर आपण पेन्शनर असू तर काहीतरी ठीक आणि जर माझ्यासारखे ‘टेन्शनर’ असतील तर काही धडगती नाही. शाश्वती देता येत नाही. हा झाला सर्वतोपरी विचार.

पण माझ्या स्वतःच्या बाबतीत मी जरी पेन्शनर नाही तरी तो अपवाद ठरतो. कारण पुढील प्रसंग लक्षात घ्याल तेव्हा आपणच आपल्या मुलांचं कोड-कौतूक करावं तेवढं थोडं आहे, असं नक्की वाटेल. तो कौतुकाचा प्रसंग म्हणजे माझा मुलगा चि. श्रीपाद व सून सौ. अंजली आणि मुलगी सौ. मनिषा हर्णे व जावई श्री. संजय हर्णे, सोलापूर या चौघांनी मिळून आमच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस येथे घरी गेल्या दिवाळी दरम्यान अतिशय उत्साहाने व पद्धतशीर साजरा केला.

आमचे लग्न २३ नोव्हेंबर १९६० साली अमरेली (सौराष्ट्र), गुजरात येथे स्व. श्री. केशवराव नारायणराव द्याळ यांची मुलगी पुष्पलता हिच्या बरोबर झाले. त्याची ५० वर्षे २३ नोव्हेंबर २०१० ला झाली.

......................

# आवाहन

‘संपर्क’च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) (२०११-१२ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, मनिऑर्डर, कोणत्याही बँकेचा मुंबई शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा मुंबईचे लोकल चेक, ‘भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ’ या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५१०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्यावर पाठवावी.

श्री. जयवंत भोपटकर<br>
संपादक<br>
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, ‘अनिश प्रासाद’<br>
अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,<br>
पुणे - ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी सौ. सुषमा करकरे, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

- श्री. जयवंत भोपटकर

संपर्क



# संपादकीय

आपणास सर्वप्रथम हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! यंदाच्या वर्षापासून 'संपर्क' ची जबाबदारी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे, यांच्याकडे आली आहे. पुण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या विश्वस्त मंडळातील सदस्य माझा हा भार हलका करण्यास मदत करणार आहेत. आपण समस्त कऱ्हाडे ज्ञातीबंधू आणि भगिनीसुध्दा या कामात खारीचा वाटा उचलू शकता.

गेली सात वर्षे श्री. प्रभाकर कोनकर (डोंबिवली) यांनी 'संपर्क' ची धुरा अत्यंत कौशल्याने पेलली होती. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. आम्हाला त्यांची मदत नेहमीच लागेल व ती त्यांनी देण्याचे कबूल केले आहे.

पुण्यातून प्रसिध्द होणाऱ्या 'संपर्क' मधून विविध विषय हाताळावेत असे वाटते. एप्रिल–जुलै–ऑक्टोबर–जानेवारी या चार अंकातून 'संपर्क' आपल्यापर्यंत पोहचणार आहे. सध्याचे गतिमान युग हे विज्ञान, माहिती, तंत्रज्ञानाचे आहे. त्या अनुशंगाने 'संपर्क' मधील सदरे देण्याचा विचार आहे. संपूर्ण कुटुंबाने 'संपर्क' वाचावे अशी अपेक्षा आहे.

'संपर्क' मध्ये जाती–बांधवांचे सहकार्य विविध विषयात होऊ शकते. जसे, वेगवेगळे कऱ्हाडे ब्राह्मण संघ वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करीत असतात. त्यांचा कार्यक्रम वृत्तांत आपणास 'संपर्क' द्वारा होईल. सध्या तरूण युवक–युवतींचे लग्न जमविणे, एक जिकरीची समस्या होत आहे. 'संपर्क' द्वारा आपण वधू–वरांची स्थळे प्रसिध्दीसाठी पाठवू शकता. आम्ही त्याची योग्य ती दखल घेऊ.

अनेक कऱ्हाडे ज्ञाती बांधव वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करीत आहेत, त्या नामवंत डॉक्टर, आरोग्यविषयक मौलिक सूचना, सल्ले आपण 'संपर्क' द्वारा सर्वांसाठी पाठवू शकतो. आपण सर्वजण नेहमी कुठल्याशा कारणाने प्रवास किंवा पर्यटन करीत असतो. आपण पाहिलेल्या व आपल्याला भावलेल्या स्थळाविषयी 'संपर्क' कडे लिहून पाठविल्यास त्याचे स्वागत होईल.

कऱ्हाडे सर्व क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यातील यशस्वी उद्योजक, व्यावसाईक, क्रिडापटू, सिने/नाट्य/दूरदर्शन, कलाकार, नाटककार, शिक्षण महर्षी, पत्रकार, संगीत क्षेत्र अशा अनेक क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तींविषयी लेख 'संपर्क' मध्ये पाठवू शकता.

'ऋषीचे कुळ आणि नदीचे मुळ शोधून काढण्याचा प्रयत्न करू नये' असे म्हणतात. याच धर्तीवर अनेक घराणी असलेल्या कऱ्हाड्यांचे कुळ शोधून काढणे कठीण आहे. सामान्य कुटुंबातून वंशावळी लिहून ठेवण्याचा प्रघात नसतो. कारण या वंशावळीचा मागे पुढे काही उपयोग होईल ही कल्पना कोणी केलेली नसते. तरीपण आजमितीस कितीतरी घराण्यातील उत्साही मंडळींनी आपआपल्या घराण्याचे कुलवृत्तांत म्हणजे इतिहास लिहून काढले आहेत. कऱ्हाड्यांची ५४५ आडनावे, घराणी आहेत असे समजते. प्रत्येक आडनाव, घराणे वैशिष्ठपूर्ण आहे. त्याविषयी आपण 'संपर्क' मध्ये लिहू शकता.

भारतभर पसरलेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघांची समन्वय साधण्यासाठी 'संपर्क' चे माध्यमातून जर माहितीचे व मुदतीचे जाळे (छ्शीुीइ`ष ळपषीरींळेप । क्शश्रि) उभे राहिलं याची आम्हांला जाणीव आहे. यासाठी विविध शहरातील कऱ्हाडे युवा–महिला यांचे सहकार्य आम्हांला अपेक्षित आहे. ते आम्हांस 'संपर्क'साठी मिळेल याची खात्री आहे.

कऱ्हाड्यांची कुलदैवत, कुलदेवता महाराष्ट्र, भारतामध्ये विविध ठिकाणी आहेत. ज्यांचा या कुलदैवत किंवा कुलदेवता यांचे उत्सवाच्या वेळी जाण्याचा मानस असतो अशांकरिता आपण 'संपर्क' ला त्याविषयी कळविल्यास आपल्याच इतर कऱ्हाडे ज्ञाती बांधवांना त्याचा लाभ होईल.

संपर्कात राहूया! संपर्क वाढवूया!

# भूषणास्पद कऱ्हाडे - ब्राह्मण 'खांडेकर'

**वासंती खांडेकर (घैसास)**

**पानिपतच्या समरप्रसंगातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गोपाळ संभाजी खांडेकर यांना माधवराव पेशवे यांजकडून इ. स. १७६५ मध्ये माळव्यातील साडे नऊ गावांचा सरंजाम कालपरत्वे आता अस्तित्वात नसला तरी त्यावेळची सालीना जमा होणारी रोख रक्कम १०,१०१/- रूपये पुढील २१७ वर्षे म्हणजे इ. स. १९८२ पर्यंत खांडेकर घराण्यात चालू होती.**

मराठ्याच्यांच नव्हे, तर देशाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या पानिपतच्या रणसंग्रामाला जानेवारी २०१२ मध्ये २५१ वर्षे पूर्ण होत असताना महाआदराने नतमस्तक होतयं ते त्यातील माहेरच्या कऱ्हाडे खांडेकर घराण्यातील वीर पुरूषांच्या प्रत्यक्ष सहभागापुढे.

अभिमानास्पद असे खांडेकर घराणे साधारणपणे अकबर बादशाहच्या काळापासून तळकोकणात रहावयास आले. या शाखेचे पूर्वज गोपाळ महादेव हे छत्रपती शिवाजी व संभाजी महाराजांच्या वेळेपासून कारभारात होते. पुढच्या खांडेकर वंशावळीतील संभाजी तुकदेव यांच्या सहा पत्रांपैकी बहुतेक सर्व पुत्र एकाच वेळी पराक्रमी व योग्यता पावलेले असावेत ही घटना इतिहासात अशक्य नसली तरी दुर्मिळच!

संभाजी तुकदेव यांचे द्वितीय पुत्र गणेश संभाजी हे खांडेकर घराण्यातील अत्यंत तेजस्वी, पराक्रमी व कर्तृत्ववान पुरूष. पहिल्यापासूनच ते पेशव्यांच्या चाकरीत होते. वेगवेगळ्या रूपांत देशात अनेक महत्वाच्या पदांवर राहून, लढाया करून, ५० हजारापर्यंत घोडदळाचे नेतृत्व करून जवळजवळ ६० वर्षे त्यांनी मराठेशाहीची अविस्मरणीय सेवा केली. पानिपतच्या युध्दात ते अतिशय सक्रीय होते. मात्र त्यांचे व्यक्तित्व व कर्तृत्व कायम वादळी राहिले. पानिपतचे युध्द हरण्याचे खापरही काही प्रमाणात त्यांच्या डोक्यावर फोडले गेले.

संभाजी तुकदेवांचे तृतीय पुत्र गोपाळ संभाजी हे माझ्या माहेरच्या खांडेकर घराण्याचे मूळ पुरुष. गोपाळ संभाजींचे पूर्ण आयुष्य आपले वडील बंधु गणेश संभाजी प्रमाणेच मराठ्यांच्या सेवेत गेले. बाजीराव पहिले असताना ते पेशव्यांच्या सेवेत रूजू झाले. इ. स. १७५८ पर्यंत ते पेशव्यांकडील महत्वाच्या व जबाबदारीच्या पदांवर उन्नत होत होत, उत्तरोत्तर चढत गेले. मराठेशाहीचे हित पाहण्यासाठी१७६०-६१ चे सुमारास म्हणजे पानिपतच्या युध्दाअगोदर पेशव्यांनी त्यांना धार राज्याच्या दावणगिरीवर पाठवले.

पानिपतचे युध्द सुरू होताच गोपाळ संभाजी खांडेकर धारचे दिवाण म्हणून तिकडे गेले. पानिपतच्या घनघोर युध्दात त्यांनी स्वतः च्या फौजेसह स्वतः सक्रीय भाग घेऊन महत्वाची भूमिका बजावली. पानिपतच्या या महासंग्रामात गोपाळ संभाजींनी पेशव्यांतर्फे नाव घेण्यासारखी महत्वाची कामगिरी केली. त्याची दखल घेऊन, मोबदला म्हणून श्रीमंत माधवराव पेशवे एकूण साडे नऊ गावांचा सरंजाम दिला व त्याची सनद बहाल केली व आसपासची साडे आठ गावे मिळून एकूण साडे नऊ गावांचा सरंजाम दिला व त्याची सनद बहाल केली.

गोपाळ संभाजी खांडेकर यांनी २४ डिसेंबर १७६५ रोजी दिलेल्या त्या सनदेत माधवरावांनी सन्मानपूर्वक मायना तर लिहिलाच, परंतु गोपाळ संभाजींनी पेशवाईत व विशेषतः पानिपतच्या युध्दात जी उल्लेखनीय कामगिरी केली त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते लिहितात, ''तुम्ही पानिपताच्या लढाईत वगैरे हर एक ठिकाणी इमाने चांगले काम करीत आला इ.'' मंडावल परगण्यातील एकूण साडे नऊ गावे (त्यातील 'मौजे सावदी' अर्धे पवारांकडे, अर्धे खांडेकरांना दिले) व त्यावेळी तपे मजकुराचा सालीना जमेचा आकार १०,१०१/- रूपये असल्याचे सनदेत नमूद केले आहे.

खांडेकरांचा हा सरंजाम लहान, केवळ साडे नऊ गावांचा असला तरी माळव्यात पेशव्यांतर्फे दिली गेलेली अशाप्रकारची ही एकमेव जहागिरी होती. या गावांवरची मालकी पेशवाईचा अस्त झाल्यावरही इंग्रज सरकारने इ. स. १८२१ मध्ये दिलेल्या सनदेनुसार कायम झाली. ब्रिटीश सरकारने मान्यता देऊन पेशव्यांच्या वेळी असलेली स्थिती पूर्ववत ठेवली.

सरंजामाची सनद प्राप्त होताच गोपाळ संभाजी यांनी पंथ पिपलोद्यान मध्यवर्ती मान्याच्या ठिकाणी व उंचवट्याची चांगलीशी जागा पाहून स्वतः ला राहण्यासाठी व एकंदर सरंजामाची व्यवस्था चांगली ठेवण्यासाठी एक प्रशस्त किल्लेवजा गढी बांधली. या गढीच्या मध्यभागी उंचवट्यावर उभारलेला मराठ्यांचा जरी पटका भगवा झेंडा दहा-वीस मैलाच्या परिसरात डौलाने फडकताना दिसत असे. पुढे १९०९ च्या सुमारास कर्नल न्यु मार्च या पॉलिटिकल एजंटने इंदूरहुन कुमक

धाडून, गढीला वेढून तो उतरवला. खांडेकर मंडळी त्या गढीत जवळ–जवळ दीडशे वर्षे राहिली. इ. स. १९१८ च्या आसपास या गढीला व आतील इमारतींना आग लागून ती पूर्णपणे अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्या आगीत खांडेकरांचे बहुमुल्य ऐतिहासिक कागदपत्र, भांडी, फर्निचर इ. बहुमोल सामान नष्ट झाले.

पानिपतच्या समरप्रसंगातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गोपाळ संभाजी खांडेकर यांना माधवराव पेशवे यांजकडून इ. स. १७६५ मध्ये माळव्यातील साडे नऊ गावांचा सरंजाम कालपरत्वे आता अस्तित्वात नसला तरी त्यावेळची सालीना जमा होणारी रोख रक्कम १०,१०१/– रूपये पुढील २१७ वर्षे म्हणजे इ. स. १९८२ पर्यंत खांडेकर घराण्यात चालू होती. वंशपरत्वे खांडेकरांच्या मोठ्या शाखेच्या मोठ्या मुलाला ही रक्कम मिळत असे. वाडवडिलांना अभिमान वाटावा असा अत्यंत हुशार, कर्तबगार असा माझा धाकटा भाऊ 'विवेक' हा खांडेकरांच्या पंथ पिपलोदा येथील जहागिरीचा 'टाका' मिळणारा शेवटचा खांडेकर. मध्यप्रदेश विधानसभेने १९८२ मध्ये संमत केलेल्या विधेयकानुसार सर्व प्रकारांच्या नगदी नेमणूकींची समाप्ती करण्यात आली.

पानिपतच्या घनघोर युध्दात मराठ्यांनी अनेक 'मोहरे' गमावले. हजारोंच्या संख्येने वीर मराठे धारातीर्थी पडले. काही यथोचित योगदान देऊन सहीसलामत परतले. त्यातील एक होते आमच्या खांडेकर वंशाचे मूळ पुरूष गोपाळ संभाजी दैव दुर्विलास कसा असतो पहा. पानिपतच्या शौर्यगाथेला २५१ वर्षे पूर्ण होत असताना खांडेकरांची मानाची जहागिरी घेतलेला अखेरचा कर्तृत्ववान विवेक खांडेकर मात्र अकस्मिकरित्या जग सोडून गेला. कालाय तस्मै नमः|

पानिपतचा रणसंग्राम व त्यानंतरही 'स्पृहणीय' कामगिरी करणाऱ्या माझ्या माहेरच्या सर्व आदरणीय, माननीय खांडेकरांना भावपूर्ण श्रध्दांजली

लेख संदर्भ : (कै. रमेश खांडेकर, भूतपूर्व सदस्य, राज्यसभा लिखित खांडेकर कुलवृत्तांतानुसार)

# कन्या पतीची बारा संसार चित्रे

----------

**मिथून पत्नी बरोबर तुम्ही कन्या पती म्हणजे बाहुला-बाहुलीचे जोडपे. दुसऱ्या शब्दात ग्रहमालिकेतील सर्वात लहान असणाऱ्या कुमार बुधाच्या पुरूष रास, वायुतत्त्वाची रास. तुमची पत्नी मिथूनेची म्हणजे बालसुलभ प्रवृत्ती टिकवून असलेली, साहित्यात रमणारी, बुध्दीमान, निर्णयक्षमतेत मात्र कमी असणारी अशी स्त्री. सौम्य स्वभाव, हजरजबाबी, विनोदबुध्दी असणारी, मिळून मिसळून वागताना पण तशी अलिप्त राहणारी, क्षणात रूसणारी, क्षणात हसणारी अशी ही बालिका. तिच्याच प्रमाणे तुम्हीही विनोदबुध्दी असणारे, कोटीबाज बोलणारे, साहित्यात रमणारे फक्त ती साहित्याला प्रमाण मानणारी तर तुम्ही टीकाकाराच्या भूमिकेतून सर्व पाहणारे.**

'कन्या' या स्त्री राशीच्या पुरूषांच्या पत्नींविषयी लिहिणे हाच मुळी एक विनोद होतो. कन्येच्या सहधर्मचारिणी असे म्हटले की, हसायलाच येईल नाही का? पण तुम्ही कन्या लग्न, कन्या चंद्र किंवा कन्या रवि यापैकी कोणत्याही ग्रहस्थितीवर जन्माला आलेल्या मंडळींनी अजिबात वाईट वाटून घेऊ नये. कारण स्त्री राशी आणि पुरुष राशी ही ज्योतिषविज्ञानातील राशी विभागणी ही उर्जा आणि उर्जेचे कार्यात रुपांतर अशी असते. वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर आणि मीन या सहा राशी (बारापैकी निम्या) स्त्री राशी समजल्या जातात. अर्थात, प्रत्यक्ष काम करणाऱ्या ठरतात. तुमच्या बाबतीत फरक एवढाच की, तुमच्या राशीच्या नावातच 'कन्या' शब्द आहे, त्यामुळे इतर पाच स्त्री राशींपेक्षा तुमचे स्त्रीराशीतव पटकन ध्यानात येते. पण मित्रांनो, तुम्हाला म्हणून सांगतो बारा राशीत 'मानव' वश्य असणाऱ्या राशींमध्ये तुमची कन्या रास गणली जाते आणि त्याच अंगाने 'बुध्दिमान' राशींमध्येही 'कन्येची' गणना अग्रक्रमाने केली जाते. स्मरणशक्ती, ग्रहणशक्ती, आकलनक्षमता आणि विशेष करून विश्लेषणात्मक बुध्दी या तुमच्या ऋण बाजू. बारा राशींच्या वधुंशी तुमचे कसे जमेल, कितपत जुळेल हे बघण्यापूर्वी थोडक्यात तुम्हाला तुमचीच ओळख करून दिली तर जास्त चांगले, होय ना?

जन्मकालावरून तुमची ओळख म्हणजे १४ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर या कालावधीत जन्मदिनांक असणे अर्थात सूर्यदेवांची स्वारी कन्या राशीतून भ्रमण करण्याचा कालावधी किंवा ज्योतिषीय भाषेत कन्या, रवि वर जन्मलेली माणसे. महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री आणि सध्याच्या काळातील लोकप्रिय अभिनेते अमिताभ बच्चन ही सर्व मंडळी रवि कन्याराशीत असताना जन्मली. दुसरा ज्योतिषीय विचार म्हणजे कन्या राशीत चंद्र असणे. दर महिन्यात (मराठी महिने चैत्र, वैशाख) २१/४ दिवस चंद्र कन्या राशीत असतो. होळी पौर्णिमा किंवा फाल्गुनातील वद्य प्रतिपदा-द्वितीया या चंद्र उत्तराफाल्गुनी-हस्त-चित्रामध्ये म्हणजे कन्येत असणाऱ्या तिथ्या, चैत्रात शुध्द त्रयोदशी चतुर्दशी पौर्णिमा मागे मागे येत भाद्रपदात अमावस्येच्या आसपास चंद्र कन्येत असतो. कन्या राशीत रवि असणाऱ्यांपेक्षा कन्या राशीत चंद्र असणाऱ्यांना कन्या लक्षणे अधिक प्रमाणात लागू पडतात. तिसरा आणि सर्वात महत्वाचा काल घटक म्हणजे 'लग्न' किंवा जन्मवेळी जन्मस्थळी उदित असणारी राशी-पूर्वक्षितिजाला लागून असणारी ती लग्नराशी. कन्या राशी (आणि तसे पाहता सर्वच राशी) पूर्वक्षितिजावर साधारणतः २ तास उदित असतात. १४ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर या काळात सूर्योद्याच्या आसपास २ तास कन्या लग्न उदित असते. जगात कोठेही गेलात तरी स्थानिक सुर्योदयानुसार कन्या लग्न असेच उदित असते. कन्या लग्न उदित होण्याची वेळ दर दिवसागणिक ४ मिनिटे मागे येत जाते व त्यामुळे महिन्याच्या कालावधीत कन्या लग्न उदित होण्याची वेळ २ तास मागे येत जाते. १४ मार्च ते १४ एप्रिल या कालावधीत सुर्यास्ताच्या वेळी कन्या लग्न उदित असते. अशा या कन्या लग्न व्यक्तीला कन्या लक्षणे सर्वात जास्त लागू पडतात.

थोडक्यात, सर्वपित्री अमावस्येच्या जवळपास सुर्योदयाच्या वेळी जन्म असता कन्या लग्न, कन्या रवि व कन्या चंद्र अशी स्थिती असते. आता तुमच्या संसाराची बारा चित्रे रंगविताना तुमचे चित्र पहिले काढून टाकले तर बरे नाही का? तुमच्या शरीरातील नजरेत भरण्यासारखा भाग म्हणजे लंबोदर अर्थात मोठे पोटावर खूण, ठसठशीत नाक, ओबडधोबड चेहरा, त्यात थोडेसे लागट असणारे पण विनोदप्रचुर बोलणे, हजरजबाबीपणा हे तुमचे विशेष. नावांमध्ये सुगंधाशी संबंध (परिमल), अनुस्वार, म/न ही अनुनासिके, जोडाक्षरे, सामुहिक शब्द, विद्या-पांडित्य निगडीत शब्द, 'कुमार' 'बाळ' इत्यादी लहान. वयाशी कन्या पुरूष मंडळींची असू शकतात. आता बारा राशींच्या कन्यांबरोबर तुमची संसारचित्रे रंगवून पाहू, नेत्रसुखद होतात का? भडक रंगांची होतात ते तुम्हाला कळेलच.

राशीचक्रातील पहिल्या म्हणजे मेष राशीच्या कन्येशी तुमचा संसार म्हणजे गुणमेलनात पूर्ण *** अशा खुणांनी दाखविलेले मृत्युषडाष्टक. या मृत्युषडाष्टकाचा अर्थ दोघांपैकी एकाचा मृत्यू असे मुळीच नाही. पण मेष आणि कन्या या

दोन राशींमध्ये समानत्वाचा एकही धागा नाही उलट सर्वच धागे परस्परविरोधी. मेष ही पुरुष रास. आक्रमक, क्षात्रधर्मी, करीन ती पूर्व, बोलभांड, एक घाव दोन तुकडे, फटकळ इत्यादी विशेषणे मेष व्यक्तिमत्वाचे वर्णन करतात. तडकाफडकी निर्णय घेणे, संतापी स्वभाव, क्रिया-प्रतिक्रिया त्वरीत क्वचित अविचारी आता असे पुरुषी गुण तुमच्या पत्नीत तर तुम्ही वैश्यवर्णी, सतत जुळवून घेणारे, वादविवादाला घाबरणारे, वक्रोक्तिपूर्ण पण स्पष्ट न बोलणारे, 'लेकी बोले सुने लागे' असे बोलणारे, निर्णयक्षमता कमी असणारे, द्विधा मनःस्थितीत राहणारे. त्यामुळे तुमचा संसार सुखाचा कसा होणार? मेष म्हणजे अग्नी आणि तो सुध्दा चर म्हणजे रानात पेटणारा वणवाच समजा आणि कन्या म्हणजे माती आणि आग विझविण्यासाठी मातीचा वापर करतात हे तुम्ही जाणताच म्हणजे या परस्परविरोधी तत्वांचे एकत्रीकरण कितपत सुखकर होणार? आणखीन एक गोष्ट ध्यानात या निसर्गकुंडलीप्रमाणे मेष ही लग्नस्थान दर्शवणारी म्हणजे 'प्रकृती' दर्शक रास तर कन्या ही रोगस्थान निदर्शक म्हणजे विकृतीदर्शक रास. प्रकृती-विकृती कसे जुळणार? खरे पाहता सर्व जग 'पोटवर चालते' असे म्हटले जाते आणि प्रत्येकाची धडपड पोटाची खळगी भरण्यासाठीच असते. पण हे सर्व मन जाणते, बुध्दीला पटले तर ठीक. म्हणजे तुमच्या मेष पत्नीला हे पटले तर षडष्टक असूनही संसार सुखाचा होईल. तिच्या निर्णयक्षमतेला तुमच्या विश्लेषणात्मक बुध्दीची जोड मिळाली तर तिचे डोके आपटणार नाही आणि तुमची नाव पुढे सरकेल (कन्या राशीच्या चिन्हात नावेमध्ये उभी असलेली, एका हातात कणीस आणि दुसऱ्या हातात उभी घेतलेली कन्या असे वर्णन आहे). खाल्लेले अन्न पोटाने पचविले तर अंगी लागते हे समजले तर तुमच्या पत्नीला तुमचे महत्त्व जाणवेल आणि रूपामध्ये पोटापेक्षा चेहऱ्याला अधिक महत्व हे तुम्ही ध्यानात ठेवा. तिच्या भडक रंगांच्या आवडीला तुमच्या 'सौम्यपणाने' हलके करा, मुलांना तिच्यापासून दोन हात दूर ठेवा, निर्णय तिलाच घ्यायला द्या, फक्त मुत्सद्दीपणाने (तो तर तुमच्या हाडीमासी मुरलेला असतोच) तुम्हाला हवा तसा बदल पण तिच्या तोंडून वदवून घ्या, शेवटी याजन्मी गाठ पडली तर निभावून न्यायला हवे, 'दोन घडीचा डाव, याला जीवन ऐसे नाव' हेच ध्यानात ठेवा. ''मनासारखा मिळे सवंगडी'' हे विसरून जा, निदान या जन्मापुरते तरी, आणि मग एवढेच म्हणू शकाल ''तुम अगर मुझको न चाहो तो कोई बात नहीं, किसी और को चाहो तो मुश्कील होगी।''

वृषभ या राशीचक्रातील दुसऱ्या आणि रसिक, कलाप्रिय, राशीची पत्नी तुम्हाला लाभली तर खरोखरच तुमचा संसार आनंदाचा होईल. खाण्याचा संबंध पोटाशी असतो आणि वृषभ नैसर्गिक कुंडलीत द्वितीय स्थानी म्हणजे खाण्यापिण्याच्या सवयी बघतात त्या जागी येते त्यामुळे तुमच्या दोघांमध्ये एक समानत्व असते, ज्योतिषी व भाषेत दोन्ही राशी पृथ्वीतत्त्वाच्या असतात. पत्नीला साहित्य, संगीत, चित्रपट, स्वयंपाक सर्वात रस, त्यात तिच्या स्वतःकडेही काही कला असण्याची शक्यता. रसिकतेत तिचा हात धरणारे कोणीच नाही. त्यामानाने तुम्हाला साहित्यात अधिक रूची पण तुम्ही प्रत्येक ठिकाणी 'नीरक्षीरविवेकाने' दूध-पाणी वेगळे करणारे. तिची बुध्दी स्थिर तर तुम्ही नेहमी दुविधेत. ती रसिक निखळ आनंदात रमणारी पण बुध्दीमत्तेत तुमच्यापेक्षा कमी. शेजारी-पाजारी, नातेवाई यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवणारी ही वृषभी तशी तुमच्यापेक्षा अधिक लोकप्रिय. घरातील सजावट पण उत्तमोत्तम आणि नेत्रसुखद करण्यात तिचा हात नक्कीच. तुमच्या बुध्दीमत्तेला तिच्या सौंदर्यदृष्टीची जोड मिळणे महत्त्वाचे. यावरून एक विनोद आठवला, एक सुंदर नटी सुप्रसिध्द नाटककार, लेखक बर्नार्ड शॉ यांना म्हणाली की आपण लग्न करू म्हणजे आपली मुले माझ्यासारखी सुंदर व तुमच्यासारखी बुध्दीमान होतील. बर्नार्ड शॉ हजरजबाबी, ते म्हणाले, ''पण उलटे झाले तर''. पण तुमच्या बाबतीत रसिकोत्तमेजवळ ग्रहणशक्ती बरी असते, स्मरणशक्ती चांगलीच असते आणि तुमच्या बुध्दीमत्तेवर भाळण्याइतकी गुणग्राहकाताही असते त्यामुळे वृषभ पत्नी आणि कन्या वर असा संसार बऱ्यांपैकी सुखाचा होतो. तुम्ही म्हणाल, ''रूपास भाळलो मी, भुललो तुझ्या गुणांना'' आणि ती ही प्रतिसाद देईल, ''प्रेमा काय देऊ तुला, भाग्य दिले तू मला''.

मिथून पत्नी बरोबर तुम्ही कन्या पती म्हणजे बाहुला-बाहुलीचे जोडपे. दुसऱ्या शब्दात ग्रहमालिकेतील सर्वात लहान असणाऱ्या कुमार बुधाच्या पुरूष रास, वायुतत्त्वाची रास. तुमची पत्नी मिथूनेची म्हणजे बालसुलभ प्रवृत्ती टिकवून असलेली, साहित्यात रमणारी, बुध्दीमान, निर्णयक्षमतेत मात्र कमी असणारी अशी स्त्री. सौम्य स्वभाव, हजरजबाबी, विनोदबुध्दी असणारी, मिळून मिसळून वागताना पण तशी अलिप्त राहणारी, क्षणात रूसणारी, क्षणात हसणारी अशी ही बालिका. तिच्याच प्रमाणे तुम्हीही विनोदबुध्दी असणारे, कोटीबाज बोलणारे, साहित्यात रमणारे फक्त ती साहित्याला प्रमाण मानणारी तर तुम्ही टीकाकाराच्या भूमिकेतून सर्व पाहणारे. तसा तुमचाही स्वभाव सौम्यच. दोघांनाही रंगसंगती, सजावट सर्वांमध्ये सौम्यपणा पसंत. दोघांच्यामध्ये अनेक समान धागे पण दोघांकडेही निर्णयक्षमतेची वानवाच. दोघेही तसे द्विस्वभावाची, बालिश का बालसुलभ ते ठरविणे कठीणच. संतती तशी नशीबवान कारण त्यांना आईवडील म्हणजे मित्र-मैत्रिणीसारखेच. पण वडीलकीचा सल्ला देणारे कोण? तशी तुमची भांडणे होत नाहीत असे नाही कारण तुमच्या राशी एकमेकांच्या केंद्रात म्हणजे ९० अंशांच्या अंतरात. ज्योतिषात याला केंद्रयोग म्हणतात आणि केंद्रयोग संघर्ष सुचवितो. फक्त दोघांचा राशीस्वामी एकच आणि तो सौम्य, इंदुपुत्र. त्यामुळे संघर्ष हा चहाच्या पेल्यातील वादळासारखाच. तेव्हा पती या नात्याने तुम्ही तुमची निर्णयक्षमता वाढवा, टीकेचा सूर बदला, दोघेजण मिळून नक्की म्हणाल, ''धीरे धीरे चल चांद गगनमें''।

तुमची आणि कर्क स्त्रीची पती-पत्नीची जोडी म्हणजे खूप जुळणारी नसली तरी अगदीच न जुळणारी अशीही नाही. कर्क रास ही तुमच्यासारखीच स्त्री रास, कर्केचा स्वामी चंद्रही तुमच्या राशीस्वामी बुधासारखाच सौम्य ग्रह. फक्त कर्क ही चर रास अर्थात निर्णयक्षमता व क्रियाप्रतिक्रिया जलद, तीव्र असतात. तशी कर्क स्त्री भावनाप्रधान, हळवी पण स्वभावाने खूप चंचल असते. प्रेमळ मातेसारखी ही कर्क स्त्री पत्नी म्हणून 'भोज्येषु माता' हे लक्षण नक्कीच पूर्ण करते. घरकाम, बालसंगोपन, शेजार-पाजार नातेवाईक

यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध या बाबतीत बारा राशीच्या स्त्रियांत अग्रक्रमाने कर्क पत्नीचे नाव द्यावे लागेल. फक्त तुमच्या संशयी, शंकेखोर स्वभावामुळे तुमचे तिचे कसे जुळणार? त्यात तिच्या निर्णयक्षमतेपुढे तुम्ही फिके पडता. घरामध्येही सर्व क्षेत्रात तिचाच वरचष्मा आणि बोलबाला. तुमच्या तिरकस बोलण्याचा, टीकाखोर वृत्तीचा, आडून बोलण्याचा तिला तिटकारा. तसे पाहता तुमचा राशीस्वामी असणाऱ्या बुधाला इंदुपुत्र म्हणतात आणि इंदु म्हणजे चंद्र. त्यामुळे अर्थातच चंद्राची कर्क आणि बुधाची कन्या या राशींचे बऱ्यापैकी जमावयाला हवे. पण कर्क ही जलतत्त्वाची रास तर कन्या ही पृथ्वीतत्त्वाची रास. वाहत्या पाण्याला अडविण्यासाठी मातीचा बांध घालतात आणि माती पाण्याच्या प्रवाहात वाहून जाते. थोडक्यात हे जल–पृथ्वीचे नाते थोडसे न पटणारेच, पण त्याचवेळी पाणी साठविण्यासाठी मातीचे भांडे लागते आणि मातीच्या कणांना एकत्र ठेवण्यासाठी थोडे पाणी लागतेच. तेव्हा कर्क – कन्या जोडपे एकमेकांशी सहकार्य करीत आनंदात राहू शकते. कर्क पत्नीला मनाचे महत्त्व तर कन्या पतीला बुध्दीचे आकर्षण पण मन आणि बुध्दी एकत्र आले तर जीवनाचा स्तर उंचावणारच नाही का? तुमच्या चतुरस्त्र भावनाप्रधान स्वभावाचा गोडवा गावा, तुमची पत्नी नक्कीच म्हणेल, ''ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे''.

कन्या राशीच्या पुरूषाचे सिंह स्त्रीशी जमणे तसे कठीणच. अर्थात कन्या–मेष जसे षडाष्टक तसे तुमचे जोडपे निश्चितच नाही. पण कितीही म्हटल तरी आपल्या पुरूषप्रधान संस्कृतीत साहसी, आक्रमक पत्नी आणि सतत दुविधेत असणारा, संशयी पुरूष हे जोडपे नांदणे कठीणच. मेष पती, कन्या पत्नी किंवा मेष पत्नी–कन्या पती ही दोन्ही जोडपी षडाष्टकातील. पण त्यातील पहिले नांदण्याची शक्यता थोडी जास्त कारण नैसर्गिकदृष्टीने आक्रमक असणारा पुरुषच साहसी राशीचा होतो. तसेच सिंह पती–कन्या पत्नी हे जोडपे अधिक चांगले नांदू शकते, कारण पतीराज वनराज असतात. तुमच्या सिंह पत्नी–कन्या पती जोडप्यात पत्नी राणी, पण तुम्ही राजा नसता. इथेच तुमच्या पुरुषी अहंकाराला ठेच पोचते. पण स्त्री पुरूष समानतेच्या जगात तुमच्या पत्नीच्या सात्विक वृत्तीचा, स्थिर बुध्दीचा, कठोर निर्णयक्षमतेचा, धीरोदात्त स्वभावाचा तुम्हाला अभिमान वाटला पाहिजे. सिंह ही रविची रास तर कन्या बुधाच्या स्वामीत्वाखालील रास. राजा निर्णय जरूर घेतो पण त्याचे निर्णय कार्यान्वित करण्यासाठी सचिव लागतोच. इतकेच नव्हे तर राजाला निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी लागणारी माहिती सचिवच देतो हे ध्यानात घ्या आणि गृहिणी सचिव, ऐवजी तुम्हीच तुमच्या पत्नीचे सचिव बना. पत्नीचा स्पष्टवक्तेपणा, सडेतोड स्वभाव, अन्याय सहन न करण्याची वृत्ती सर्व योग्यच असते. रविप्रधान अशा या स्त्रीला तुमच्या बुधप्रधान व्यवहार चातुर्याची जोड मिळाली तर संसाराचे चित्र नक्कीच उत्तम होईल. सचिव बनण्यात कमीपणा कसला, आठवा दूरदर्शनवरील जुनी इंग्रजी मालिका, ''येस मिनिस्टर'' किंवा ''येस प्राईम मिनिस्टर''. सिंहाला जर थोडा मान दिला की कन्येची मान शाबूत राहणारच. तसा बुध नेहमी रविचे बोट धरून मागेपुढे राहात असतोच आणि ज्योतिषात फक्त बुधाला अस्तंगत्वाचा दोष कमी आणि बुधादित्य योगाला (रवि–बुध युती) विद्वत्तेचे प्रतिक समजतात. मग तुमच्या विनोदी, हजरजबाबी बोलण्याने पत्नीच्या तापट स्वभावाला आवर घाला, तिच्या स्थिर बुध्दीला तुमच्या चतुरस्त्र बुध्दीची जोड द्या, संततीला तुम्ही आईच्या चढत्या पाऱ्यापासून दूर ठेवा, आपोआपच 'एक मंजिल राही दो फिर प्यार न कैसे हो' अशी परिस्थिती घरात राहील.

पती–पत्नी दोघेही कन्या राशीचे असे म्हटल्यावर आठवते ते देवळांच्या संशयकल्लोळमधील फाल्गुनराव–कृत्तिकेचे जोडपे. संपूर्ण नाटकच मुळी खोट्या संशयावर आधारित. तसे फाल्गुनराव–कृत्तिकेचे संवाद, बोलणे खटकेबाज, म्हणींनी सजविलेले अगदी तुम्हा कन्या मंडळींना शोभेसे. तसे नवराबायको दोघेही एकाच राशीचे म्हणजे ३६ गुण जमलेले जोडपे. तुम्हा दोघांनाही वाचनाची आवड, दोघांचेही वाचन चतुरस्त्र, दोघांच्याही जीभेवर सरस्वती, दोघांचीही स्मरणशक्ती उत्तम, दोघेही तुंदिलतनु लंबोदर, आणि सतत ''इधर जाऊँ या उधर जाऊँ'' अशा संभ्रमात दोघेही, दोघांच्याही नजरेत काळा रंग, चूक प्रथम भरते. त्यामुळे परस्परांचे कच्चे दुवे शोधत राहाल तर फक्त भांडणेच होणार, तू तू मै मै होणार आणि तुम्ही मग ज्योतिषशास्त्राच्या नावाने खडे फोडणार की कसले ३६ गुण नी काय. पण उलट काय नाही ते बघण्यापेक्षा काय आहे ते बघितले, स्मरणशक्ती, बुध्दी यांचा वापर सकारात्मक कामासाठी केला तर अधिक चांगले, होय ना. तसे दोघांनाही ढगळ कपड्यांची आवड, स्वभाव सौम्य आणि रंगही सौम्यच आवडतात, थोडासा अव्यवस्थितपणा दोघांमध्येही, घरामध्ये पुस्तके, ध्वनीमुद्रिका, सीडीज पासून रिकाम्या बाटल्यापर्यंत कशाचाही संग्रह असणारच. फक्त तो व्यवस्थित ठेवणे दोघांनाही जमत नाही, दोघांच्याही मनात आरोग्यापासून प्रत्येक विषयावर शंकाकुशंका तेव्हा उत्तर एकच, 'कन्या रास संकटाची' हे डोक्यातून काढून टाका. जीवनात पोटाचे महत्त्व जाणा, पोट बिघडले तर जीवन बिघडते, तुम्ही दोघेही उदरस्थानी येणाऱ्या कन्येचे प्रतिनिधी, एकमेकांना जपा, खुश ठेवा, बिघडवून देवू नका, घरात आनंदी आनंद पसरेल, दोघेही म्हणाल, 'देखो रूठा ना करो, बात नजरों की सुनो, हम ना बोलेंगे अभी तुम सताया न करा'.

तूळ राशीची स्त्री आणि कन्या राशीचा पुरूष हे जोडपे म्हणजे राशीचक्रातील बरोबर मधोमध असणाऱ्या कन्या व तूळ या -----------सहाव्या–सातव्या राशीबरोबर मधोमध येतात. २७ नक्षत्रातील बरोबर मधोमध येणारे चित्रा नक्षत्र या कन्या व तूळ राशीत बरोबर अर्धे विभागलेले असते. १२ राशी आणि २७ नक्षत्रे या गणितामुळे १ रास म्हणजे २–१/४ नक्षत्रे होतात. म्हणून प्रत्येक नक्षत्राचे ४ भाग केले जातात त्याला नक्षत्राचे चरण किंवा पाद म्हणतात. चित्रा नक्षत्राचे पहिले दोन चरण कन्या राशीत तर उरलेले दोन चरण तुळेत येतात. या चित्रा नक्षत्राच्या योगताऱ्यावरूनच आपल्या निरयन विचारसरणीतील मेषारंभ बिंदू ठरविलेला आहे. असो, कन्या राशीला ज्योतिषाची आवड असण्याची शक्यता म्हणून थोडीशी माहिती दिली. मुळामध्ये कन्या ही बुधाची तर तूळ ही शुक्राची रास. हे दोन्ही अंतर्ग्रह रजोगुणी स्वभावाचे. कन्या ही तुमची रास पृथ्वीतत्त्वाची, द्विस्वभाव

तर तूळ रास वायूतत्त्वाची, चरस्वभावाची. त्यामुळे तुमची तूळ पत्नी तुमच्यापेक्षा खूप शिडशिडत असण्याची शक्यता.समतोलाकडे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुमच्या पत्नीची निर्णयक्षमता चांगलीच असते. जनसंपर्क, माणसे जोडणे या प्रांतातही ती तुमच्यापेक्षा काकणभर, नव्हे खूपच सरस असते. शुक्राच्या राशीस्वामीत्वामुळे दिसण्यातही तुमच्यापेक्षा उजवी असते. तसे तुम्ही दोघेही सौम्य स्वभावाचे, तुम्हाला साहित्यात रस तर पत्नीला साहित्याबरोबरच संगीत, नृत्य, चित्रकला अशा कितीतरी गोष्टीत रस. तुम्ही टीकाकाराच्या दृष्टीतून बघणार तर ती रसिक नजरेने प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेणार. गृहसजावट, मांडणी यात कलात्मक नजर तिची चांगली, मात्र मागे मागे रहाणे हा स्वभाव असल्याने जगाला तिची किंमत कळत नाही. विश्लेषणात्मक बुध्दी मात्र तुमच्याजवळ चांगली तुमची बुध्दी आणि तिची रसिकदृष्टी यांचा संगम खरोखरच तुमच्या घराला कोणालाही हेवा वाटावा असे आनंदधाम बनवेल आणि घरातून गाण्याचे सूर उमटतील, ''आँखो में क्या जी रूपहला बादला, बादल में क्या जी किसीका आँचल, आँचल में क्या जी अजबसी हलचल''.

कन्या पतीला वृश्चिक राशीची पत्नी मिळणे म्हणजे एक प्रकारे जुने हिशोब चुकते करण्यासाठी एकत्र आलेले जोडपे. त्यातही गंमत म्हणजे तुमची कन्या रास निसर्गकुंडलीत षष्ठात म्हणजे रोगस्थानी येते तर पत्नीची वृश्चिक रास अष्टम म्हणजे मृत्युस्थानी येते. अर्थात तशा या दोन राशी एकमेकांपासून तिसऱ्या-अकराव्या म्हणजे त्रिरेकादश योगातल्या. दोन्ही ही स्त्री राशी, मात्र एक पृथ्वीतत्त्वाची तर एक जलतत्त्वाची, एक द्विस्वभाव तर दुसरी स्थिर, एक बुधाची तर दुसरी मंगळाची म्हणजे स्त्रीत्व सोडून दोन्हीत समानत्व नाही. त्यात बुध-मंगळ, पृथ्वी-जल सर्वच परस्पर विरोधी. तुम्ही संशयी तर पत्नी पाताळयंत्री, तुम्ही शंकासुर तर पत्नी कटकारस्थानी. तुम्ही चतुरस्त्र बुध्दीमान कोटीबाज तर पत्नी थोडीशी आक्रमक, स्पष्टवक्ती, एक घाव दोन तुकडे करणारी. तसे दोघेही झाकून ठेवण्यात हुशार पण तुम्ही एखादी गोष्ट. माहिती निर्हेतुक झाकून ठेवता तर पत्नी हेतुपूर्वक दडवून ठेवते. तुम्ही सौम्य स्वभावाचे, पत्नी जहाल स्वभावाची. तुमच्या बोलण्यात टीका जरूर पण तुम्ही विनोदाच्या सहाय्याने दुसऱ्याचे दोष दाखविणार तर पत्नी टोचून बोलणार, वागबाणांनी घायाळ करणार. स्त्री असून पुरूषासारखी हुकुमत गाजवण्याची आवड, भडक रंगांची, सजावटीची आवड, धाडस-साहस यांची आवड, नाजूक, कोमल भावनांचा अभाव या सर्वांमुळे घरामध्ये वादावादी किंवा वादळापूर्वीची किंवा नंतरची शांतता, तीसुध्दा असह्य होणारी मेष पत्नीशी मृत्युषडाष्टक, तसे वृश्चिक पत्नीशी नाही. पण बाकी बरेचसे तसेच संसारचित्र. तुमचा विनोद समजण्याएवढी विनोदबुध्दी तिच्याजवळ नाही आणि तिचा पराक्रम मानण्याएवढा मनाचा मोठेपणा तुमच्याजवळ नाही. तुम्ही त्या विंचवाच्या नांगीच्या फटक्यापासून जपून रहा, पत्नीला मोठेपणा द्या, तुमचा भित्रा स्वभाव सोडून धाडसी व्हा, बुध्दीची चमक दाखवा, तुमचा संसार अगदी अवघा आनंदी आनंद असा नाही तरी सुखावह नक्कीच होईल. दोघांनाही समजेल, ''मोहब्बत बडे काम की चीज है।''

कन्या पती आणि धनु पत्नी म्हणजे दोन द्विस्वभाव माणसांचे जोडपे. अर्थात स्त्री असली तरीही धनु राशीची पत्नी तुमच्यापेक्षा अधिक ठाम, पराक्रमी आणि कार्यक्षम असते. तसे तुमची रास वैश्यवर्णी तर पत्नीची रास क्षात्रधर्मी, तुम्ही राजस तर पत्नी सात्विक, पण बुध म्हणजे ग्रहणशक्ती, स्मरणशक्ती तर गुरू म्हणजे ज्ञान, पांडित्य, विद्वत्ता. स्मरणशक्ती म्हणजे विद्वत्ता, ज्ञान मिळविण्यासाठी स्मरणशक्ती हवीच. त्यामुळे ज्योतिषात बुध-गुरू नैसर्गिक जोडिदार होतात. शिवाय बुध म्हणजे वाणी (वाचा ) तर गुरूचा गूण शब्द (आकाशतत्त्वामुळे) वाणीला शब्दाचा आधार लागतो आणि वाणी आहे म्हणूनच शब्द संपत्ती तयार झाली. अर्थात बुध-गुरू च्या अधिपत्याखालील तुम्ही आणि तुमची पत्नी या दोघांना हे उमजेल तर परस्परपूरक भूमिका तुम्ही बजवाल. तसे तुम्हाला पत्ते, बुध्दिबळ, कॅरम असे बैठे खेळ प्रिय कोडी, आकडेमोड अशी बौध्दिक कसरत आवडते तर पत्नीला क्रिकेट, हॉकी, कबड्डी असे मैदानी खेळ प्रिय आणि दंड-बैठका अशी शारिरीक कसरत हवी. तशी पत्नीजवळ कोमल, नाजूक भावनांची वानवाच. वाचनाची तुमच्याइतकी नाही तरी थोडी आवड तिला असतेच. पण तुम्हाला छोट्या कथा, विनोदी चुटके प्रिय तर पत्नीला कादंबरी, चरित्रग्रंथ प्रिय. नैसर्गिकरीत्या संसाराचे चाक तिच्या हाती अधिक सुरक्षित असते. कारण नेतृत्वगुण तिच्या रक्तातच, वृत्तीतच असतो. मुलांनाही तिचा धाक अधिक, रंगसंगतीत तुम्हाला हिरवा-निळा आणि त्यातही त्यांच्या सौम्य छटा प्रियश तर पत्नीला केशरी पिवळा असे रंग व त्यांच्या थोड्याशा गडद छटा प्रिय. बाहेर जाऊन सरकारी कचेरीपासून कोणत्याही तक्रार निवारण केंद्रापर्यंत कामासाठी जाणे व काम यशस्वीपणे करणे यात तुमची पत्नी तुमच्यापेक्षा खूपच यशस्वी असते. तसा समाजातही तिला न मागता मान मिळतो, आदर मिळतो. तसा तुम्हीही तिला आदर द्या, सत्वगुणी धनु स्त्री धनुष्याला बासनात गुंडाळून तुमच्या बुध्दीचा मान राखेल. घरात आनंद नांदेल, दोघेही गाल, ''दिलकी नजरसे, नजरोंके दिल से, ये राज क्या है, ये बात क्या है, कोई हमे बता दे।''

कन्या व मकर ही पती-पत्नीची जोडी ज्योतिषीय भाषेत नवपंचम या अत्यंत शुभयोगातील, दोन्ही राशी पृथ्वीतत्त्वाच्या, कन्या ही द्विस्वभाव तर मकर ही चर स्वभावाची रास हाच काय तो फरक. तसे दोघांचे राशीस्वामी अनुक्रमे बुध व शनि हे एकमेकांचे मित्रच. दोन्ही राशी स्त्रीराशी असल्या तरीसुध्दा कन्या बौध्दिक बाजू सरस असलेली पण सहनशीलता कमी, शारिरीक कष्टाची तयारी नसलेली उलट मकर बौध्दिक बाबतीत थोडी लंगडी असली तरी सहनशक्तीत बारा राशीत नंबर एकवर असलेली, शारिरीक कष्टांना पण अजिबात मागे पुढे न पाहणारी. त्यामुळे संसाराचा गाडा ओढण्यातील कष्टाची कामे आपोआपच मकर पत्नीकडे जातात. तशी तुमच्या सौम्य रंगांच्या आवडीला निळी-काळी किनार लावण्याचे काम मकर पत्नी चांगले करते. तशी तिला फारशी हौस मौज नसतेच त्यामुळे घराच्या रंगसंगतीपासून सजावटीपर्यंत तुमचाच निर्णय चालतो. तुमचे घर व्यवस्थित व स्वच्छ ठेवण्याचे काम पत्नी करतेच पण तुमचा संग्रह. मग तो पुस्तकांचा असो वा रिकाम्या बाटल्यांचा असो, योग्य प्रकारे सांभाळणे मकर पत्नीला जमते. तशी वृषभ पत्नी हे काम अधिक कलात्मक

दृष्टीने करेल पण तुम्हाला ऐकवून दाखवित राहील. मकरेची पत्नी मूकपणे काम करील. क्वचितच निषेध नोंदवेल, तो सुध्दा कृतीने. तुमच्या घरातील ज्येष्ठांची सेवा करण्यात मकर पत्नीचा हात कोणी धरणार नाही पण त्यात कर्तव्यदक्षता अधिक असेल, मायेचा ओलावा कमी. तसे तुमच्या संततीला आई-वडील दोघेही व्यवहारदक्ष मिळतील पण माया मिळणे कठीणच. तसे कामाचा झपाटा, निर्णयातील वेग सर्वच पत्नीकडे जास्त तितका वेग तुम्हाला गाठणे कठीणच. व्यवहारात ती पक्की तर एखाद्या गोष्टीचा कीस काढण्यात तुम्ही तज्ञ. तिच्या कष्टांची जाणीव ठेवा, तिला योग्य मान द्या, तिला तुमच्या बुध्दिमत्तेचा अभिमान असतोच, पण योग्य वागणूकीमुळे ती तुम्हाला आदर देईल, घरात आनंदाचे संगीत गुंजेल, थोडेसे गंभीर स्वभावाला अनुकूल असे गीत म्हणेल, ''तेरा मेरा प्यार अमर, फिर क्यों मुझको लगता है डर।''

कन्या-कुंभ ही पती-पत्नी जोडी पडष्टकातील. षडष्टकातील म्हणजे एक रास दुसरीपासून सहावी तर दुसऱ्या राशीपासून पहिली आठवी. ज्योतिषामध्ये सहाव्या स्थानाला 'रिपूस्थान' किंवा शत्रूस्थान म्हणतात तर आठव्या स्थानाला मृत्युस्थान म्हणतात. एकमेकांपासून सहाव्या-आठव्या स्थानी येणाऱ्या राशीत खूप विरोध असतो. म्हणजे कन्या ही द्विस्वभाव, स्त्रीजातीची, वैश्यवर्णी पृथ्वीरास, कन्येपासून सहावी येणारी कुंभ रास ही स्थिर, पुरूषजातीची, शुद्रवर्णी, वायुरास. अर्थात कन्येपासून आठव्या येणाऱ्या मेषेत आणि कन्येत जेवढा विसंवाद असतो, तेवढा विसंवाद कन्या-कुंभेत नसतो. वैश्य-शुद्र, पृथ्वी-वायु, बुध-शनि हे सर्व बऱ्यापैकी सुसंवादी असतात. फक्त इथे पत्नी तुमच्यापेक्षा अधिक बुध्दीमान असण्याची शक्यता खुप असते. तुम्ही 'एक ना धड भाराभर चिंध्या' या जातीतील विद्वान तर पत्नी एखाद्या विषयात चांगली तज्ज्ञ असू शकते. रसिकता, कोमल भावना, शृंगाराची आवड या सर्व विषयात कमी पडणारी ही तुमची पत्नी ठिय्या मारून बसून करायच्या कामात मात्र तरबेज असते. न दमता, न कंटाळता ती कामे करीत राहते. मकर-कुंभ राशीच्या स्त्रिया विशेष अपेक्षाच ठेवत नाहीत. त्यामुळे तुमच्या घरात वादविवाद तसे नाहीतच. तशी तुमच्याकडेही रसिकता कमीच, कोमल भावनाही कमीच त्यामुळे तुमचे हे कन्या-कुंभ जोडपे व्यावहारिक पातळीवरच अधिक असते. या जोडप्यात बाहेरच्या जगाशी संपर्काचे काम तुमच्यावरच अधिक, मुलांना धाकही तुम्हीच दाखवणार कारण पत्नी सर्वापासून तशी अलिप्त, 'सुखेदुःखे समे कृत्वा' अशा वृत्तीची, फक्त तुमच्या हाताला हात लावून 'मम' म्हणणारी. मात्र एक ध्यानात ठेवा, तिला स्वतंत्र बुध्दी, विचार, मत असते आणि तुम्ही सल्ला विचारलात तरच सल्ला देणारी ही पत्नी 'कार्येषु मंत्री' म्हणून नक्कीच सुयोग्य असते. तिला योग्य पद द्या, आपोआप गीत उमटेल, 'तेरे मेरे सपने अब एक रंग है'।

राशीचक्रातील शेवटच्या मीन राशीची स्त्री ही तुमची खरी नैसर्गिक जोडीदार. म्हणजे कन्या-मीन या समोरासमोरच्या राशी-लग्न-सप्तहातील राशी. दोन्ही द्विस्वभाव स्त्री राशी हा सामाईक गुण तर पृथ्वी-जल तत्त्व आणि बुध-गुरू राशीस्वामी हे पूरक गुण. आधी म्हटल्याप्रमाणे पृथ्वी-जल एकमेकांचे शत्रू पण होतात आणि सहकारी पण बनू शकतात. बुध-गुरूंना ज्योतिषशास्त्रात एकमेकांचे मित्र मानीत नाहीत पण गुरूच्या आकाशतत्त्वाचा गुण जो शब्द त्याला वाणीशिवाय अर्थ प्राप्त होईल का?आणि बुधाच्या अंमलाखालील वाणी(वाचा) शब्दच नसतील तर काय उपयोगाची ?म्हणजे बुध-गुरूच्या भूमिका पूरक होतात. तेच तुमच्या कन्या पती-मीन पत्नीच्या जोडप्यात आहे. प्रश्न एवढाच की, दोघांच्यातही निर्णयक्षमता कमी, दोघेही दुविधेत पडणारे, दोघांजवळही आक्रमकता, साहस, धाडस, धीटपणा कमी. तुम्ही व्यवहारी तर पत्नी भाबडी. तुम्ही देवाला नमस्कार करणार ते सुध्दा मनात शंका ठेवून की खरेच देव अस्तित्वात असतो का? आणि पत्नी उठता बसता देवाला, बुवा-महाराजांना नमस्कार करणार. तसे मुले तुम्हाला बनवू शकण्याची शक्यता कमी पण आईला सहज बनवतात. पत्नीत व्यवहारीपणा कमी, वाहत जाण्याची वृत्ती, शारिरीक बल कमी अशा समस्या असतात. आजच्या छानछोकीच्या जगात न बसणाऱ्या साध्या सरळ वृत्तीच्या या पत्नीत हळवेपणा, भाबडेपणा सुध्दा खूप असतो. पण त्याचबरोबर निःस्वार्थ बुध्दीने निर्व्याज प्रेम करण्याचा स्वभाव असतो. तुमच्या चतुरस्त्र बुध्दीपुढे तिच्या बुध्दीचा काही पाडाव लागणार नाही, हे पण या सत्त्वगुणी स्त्रीला माहीत असते. पण समर्पण हा भाव तिच्या मनात प्रबळ असतो. किंबहुना स्वतःला विसरून तुमच्या संसारात रममाण होणारी ही एकमेव मीन पत्नी. तिचे समर्पण, तुमच्या ठायी असणारी भक्ती ध्यानात घेऊन तिचे पतीपरमेश्वर असणारे तुम्ही खरोखरीचे ईश्वरासारखे द्याळू बना, पत्नी नक्कीच म्हणेल, ''जीवनडोर तुम ही संग बांधी''.

अशी ही तुमच्या-कन्या पतीच्या-संसाराची बारा तऱ्हांची कहाणी. तुमच्या बुध्दीमत्तेला शोभतील अशा मिथून, कन्या, तूळ राशीच्या स्त्रियांपैकी किंवा थोड्या फार प्रमाणात समानधर्मी अशा वृषभ-मकर राशीच्या स्त्रियांपैकी तुमची जोडीदार असेल तर तुम्ही भाग्यवान म्हटले पाहिजे. सिंह, धनु, कुंभ राशीच्या किंवा अगदी कर्क राशीच्या पैकी एखादी जोडीदार मिळणे म्हणजे विशेष श्रेणीत उत्तीर्ण नाही पण प्रथम-द्वितीय श्रेणी. मीन राशी तर तुमची नैसर्गिक जोडीदार. वृश्चिक आणि मेष त्यातही खास करून मेष राशींच्या स्त्रियांपैकी एक मिळणे म्हणजे खरोखरच दोघांसाठी कसोटीचा काळ. पण कोणत्याही राशीची पत्नी मिळो, तुमचा विवाह प्रेमविवाह अथवा ठरवून झालेला असो, एक निश्चित ज्याअर्थी तुम्ही एकमेकांना वरले आहेत. त्याअर्थी तुमच्या कुंडल्यात लग्नराशी, चंद्रराशी, रविराशी जरी षडष्टकातील असल्या तरी काहीतरी समानत्व असेलच. कोठेतरी नवपंचम, समसप्तक असेल म्हणून तुम्ही एकत्र आलात. तेव्हा हा ईश्वरी संकेत समजून घ्या, आपल्या दोषांकडे पाहा. जोडीदाराचे गुण बघा आणि विवाहबंधनाला बंधन न समजता प्रेमाचा पाश समजा. सुखी व्हा.

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्‌गुरू

**।।श्री दिगंबरदार महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे ‘ध्येय’. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

## मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)

सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४

दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८

Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# फळांचे औषधी गुणधर्म

**सौ. अंजली श्रीकांत माईणकर**

**आपण विविध प्रकारची फळे खात असतो. काही आपल्याला आवडतात म्हणून किंवा चांगली लागतात म्हणून आपल्याला त्यांचे औषधी गुणधर्म माहित नसतात. प्रत्येक फळात काहीतरी औषधी गुणधर्म असतात आणि ते आपल्या आरोग्याचे रक्षण करतात.**



**खजूर :**

खजूराचे झाड शिंदीच्या झाडासारखे असते. पिकलेल्या फळाला खजूर म्हणतात. वाळलेल्या फळाला खारीक म्हणतात. हे फळ सृष्टीदायक आहे. दमा–खोकला असेल तर तूप, साखर, मध, पिंपळी व खजूर एकत्र करून घ्यावे. सर्व समप्रमाण घ्यावे. आवाज बसल्यावरही याचा उपयोग होतो. मोठ्यांना २ चमचे आणि लहानांना १ चमचा दिवसातून २ वेळा घ्यावे.

**जांभूळः**

जांभळाचे तीन प्रकार आहेत. १. महाजंबू २. काक जंबू ३. भूमि जंबू खाण्यासाठी महाजंबू चांगली असतात. जांभळीने रक्तस्त्राव थांबतो. मूत्र स्तंभन होते. पण फार खाऊ नयेत.

**डाळिंबे :**

डाळिंबामुळे तहान शमते. तापावर गुणकारी आहे. ह्दयाला हितकर आहे. एचबी वाढते. घुणा फुटल्यावर डाळिंबाच्या पानाचा रस काढून २ थेंब नाकात घालावे.

**द्राक्षेः**

द्राक्षामुळे ताकद येते. जागरणाने किंवा तिखट वगैरे जास्त खाऊन आवाज बसला असेल तर द्राक्षे ठेचून त्याचा कल्प करून घ्यावा. आवाज सुटतो. अती प्रमाणात जर द्राक्षे खाल्ली तर जुलाब होतात.

**केळः**

केळाच्या झाडाच्या सर्वच भागांचा उपयोग होतो. केळफुलाची भाजी मधुमेहावर खावी. पिकलेली केळी+साखर+पाणी हे समभाग घेऊन त्याला मंदआच द्यावी. सर्दी, खोकला, पित्त यावर उपयोगी आहे. अपचन, आम्लपित्त व पोटदुखीवर याचा चांगला उपयोग होतो. केळ, तूप व साखर एकत्र खाल्यास वजन वाढायला उपयोग होतो.

पेरूः

पेरूच्या झाडाच्या सालीचा काढा ऊीपळल ञ्रीशर्पीी वर उपयोग होतो. पुष्कळांना संडासच्यावेळी अंग बाहेर येण्याची सवय असते ते परत आत जात नसेल तर पेरूच्या पानाचा ठेचा करून त्यावर लावावा. कच्च्या पेरूमध्ये व्हिटॅमिन 'सी ' असते. प्रतिकारशक्ती वाढण्यास त्याचा उपयोग होतो.

पपई :

सदा सर्वदा सर्व ठिकाणी उपलब्ध होऊ शकते. सर्वांना सहज परवडणारे फळ आहे. पचनमार्गाच्या सर्व रोगांवर पपई उपयुक्त आहे. पपईमुळे कोणताही अपाय होत नाही. यकृत, प्लीहावर उत्कृष्ट औषध आहे. पपईचा रस २ चमचे आणि साखर २ चमचे एकत्र करून घ्यावे. पपईचा रस नायटा, गजकर्ण व इसबावर चोळावा आणि त्यावर गरम पाणी ओतावे.

**कलिंगडः**

कलिंगड उपयोग कफप्रधान रोगात करतात. सांध्याची सूज, कावीळ, जलोदर, प्लीहोदर यावर कलिंगड खायला द्यावे. स्तनांना सूज आली असता त्यावर कलिंगडचा लेप द्यावा.

**गाजरः**

गोड गाजर खायला आवडतात. त्याचा हलवा, चटणी, थालीपीठ इ. पदार्थ आपण करतोच. गाजरात औषधी गुणधर्म आहेत. गाजरात 'ए' व्हिटॅमिन आहे आणि ते डोळ्याला उपयुक्त आहे. जखमेवर सूज आली असता गाजराचा किस लावावा. रोज गाजर खाल्ल्यास जंत होत नाहीत. गाजराचा काढा काविळीवर देतात.

**काकडी :**

काकडी मोठे, लहान सर्वजण आवडीने खातात. काकडी थंड, पाचक आणि मूत्रजनक आहे.गहू, ज्वारी मका व मुगाचे अन्न खाऊन अजीर्ण झाल्यास काकडी खायला द्यावी. उन्हाळे लागले असता काकडीचा रस, जिरेपूड आणि पिठीसाखर घालून प्यायला द्यावा.

**संपर्क :**
'चंदन', व्यंकटेशनगर,
होटगी रोड, सोलापूर
फोन : ०२१७–२६०१४५७
मोबा : ८८८८२२१७४६

# यांचेशिवय नमस्कार तो कोणाला करायचा?
# विभिन्न क्षेत्रातले निरामय प्रसिध्दी लाभलेले कऱ्हाडे

**आध्यात्मिक क्षेत्र आणि वेदविद्या या क्षेत्रातला नामवंत कऱ्हाड्यांची माहिती मिळवली. अशा नव्वदच्या वर क्षेत्रे आणि पंधराशे ते सोळाशे नामवंत कऱ्हाडे व्यक्तीमत्वांची काहींचा पूर्णपणे काहींचा केवळ नामतः अशा माझ्याकडे तयार आहेत. याची माहिती असलेल्या आणि या नावामध्ये रस असलेल्या अनेक लोकांनी माझ्याकडून ती माहिती नेली. त्यावर लेख हा लिहिलेला माझ्या वाचनात आला. संपर्क मध्ये हे लिखाण क्रमशः आणि कार्यकर्तृत्वालाप्रमाणे विभागशः आमचे ठरविले आहेत.**

'संपर्क'च्या आजवरच्या अंकामधून यांच्याशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा या शीर्षकाखाली प्रसिध्द होणाऱ्या नामवंत कऱ्हाड्यांची व्यक्तीशः माहिती आपण कोण आहोत. गेल्या काही भागांमधून आध्यात्मिक क्षेत्र आणि वेदविद्या या क्षेत्रातला नामवंत कऱ्हाड्यांची माहिती मिळवली. अशा नव्वदच्या वर क्षेत्रे आणि पंधराशे ते सोळाशे नामवंत कऱ्हाडे व्यक्तीमत्वांची काहींचा पूर्णपणे काहींचा केवळ नामतः अशा माझ्याकडे तयार आहेत. याची माहिती असलेल्या आणि या नावामध्ये रस असलेल्या अनेक लोकांनी माझ्याकडून ती माहिती नेली. त्यावर लेख हा लिहिलेला माझ्या वाचनात आला. संपर्क मध्ये हे लिखाण क्रमशः आणि कार्यकर्तृत्वालाप्रमाणे विभागशः आमचे ठरविले आहेत. गुणश्रेष्ठ कऱ्हाड्यांचे नांवही कोठे येता कामा नये याकरता झालेले प्रयत्न आणि आपल्याच --------------- गुणवान लोकांविषयी माहिती करून घेण्याबाबतचा आमची पारंपारिक, सार्वत्रिक अनास्था या दोन गोष्टींमुळे ही नांवे देणारा एखाद् दुसरा माझ्यासारखा भेटला तरी, या गोष्टींचे कौतुक होण्यापेक्षा टीका-टिप्पणात अधिक होईल याची माहिती आणि खात्री मला आहे, तरीही काही लोकांनी सुचविल्याप्रमाणे आज विभिन्न सेनांमधील----------- काही मोजक्या नामवंत कऱ्हाडे व्यक्तीमत्वांची नांवे येथे देत आहे. यानंतर अनेक क्षेत्रात प्रथम असलेल्या कऱ्हाडे व्यक्तीमत्त्वांचा थोडक्यात परिचय आणि नंतर साहित्य, गाणी, नाट्य, राजकारण, संगीत, वृत्तपत्र आणि माध्यमे, डॉक्टर्स, वकील, संस्कृत, शास्त्रे, सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातले कार्यकर्ते-------इ. अनेक विभागातील नामवंत कऱ्हाडे व्यक्तीमत्वांचा परिचय आपण करून घेऊ.

या माहितीचा उपयोग करून कोणत्याही बाबतीत आपण--------- दृष्ट्या कोठेही, केव्हाही कमी नाहीच आहोत, याची जाणीव होईल. माझ्या माहितीप्रमाणे कऱ्हाडे व्यक्तीमत्वे दुराभिमानाने पेटलेली नाहीत. त्यामुळे स्वतः विषयीचा खोटा अभिमान, त्यातून उत्पन्न इतरांविषयी तुच्छता बुध्दी, दुसऱ्याचा तिटकारा, जमेल तिथे व जमेल तेवढ दुसऱ्या ज्ञातीतील नामवंतांचा द्वेष-मत्सर-तिटकारा-निंदा या गोष्टी कऱ्हाडे लोकांजवळ अभावानेच आढळतात म्हणून याचा उपयोग केवळ माहिती आहे एवढ्यापुरता होईल. आणि काळवेळ बघुन कऱ्हाड्यांची निंदा करणाऱ्याला या माहितीच्या साहाय्याने उत्तर देण्याचे सामर्थ्य येईल. असा लेख हा माहिती देण्यामागे आहे. आज केवळ कार्यक्षेत्र -------- एवढेच पाहू.

१. भारतीय शास्त्रीय संगीत : स्वरभास्कर -भास्कर बुवा बखले, पद्मभूषण- यशवंत बुवा मिराशी, पद्मश्री-जितेंद्र अभिषेकी, पं. जगन्नाथ बुवा पंढरपूरकर (मुळ नांव निगुडकर), सुमती मुरारकर, पं. जगन्नाथ बुवा पुरोहित, श्री. शंकरराव -------, पं. राजाराम बुवा पराडकर, पं. दत्तोपंत जांभेकर, पं. वामनराव पाध्ये, पद्मश्री उल्हास कशाळकर, पं. श्रीकांत बाले, देवकी पंडित, पं. गुण्ये, बकुल पंडित, पं. उदय भवाळकर, पं. शैलेश भागवत.

२.साहित्य-काव्य नाट्य क्षेत्र : मोरोपंत पराडकर, भास्कर रामचंद्र तांबे, यशवंत दिनकर पेंढारकर, पद्मभूषण-विष्णू सखाराम खांडेकर, बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर, शंकर केशव कानेटकर, वसंत कानेटकर,--------वि. सा. गुर्जर, भ.श्री. पंडित, अनंत गोपाळ शेवडे, स्वानंदा करकरे, इंदिरा संत, प्रभाकर पाध्ये, आनंद साधले, दत्तो वामन पोतदार, दुर्गा भागवत, वि. वा. हडपे, सुरेश भट, माधव केशव काटदरे, ह. श्री. शेणोळीकर, वि. नो. महाजनी, मा. वि. किवे, पंडित सप्रे, कॅप्टन वासुदेव बेलवलकर, भा. रा. भागवत, रा. अ. काळेले, भालचंद्र पेंढारकर, सुधीर मोघे

३. सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रे : पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर, श्री. माधवराव स. गोळवळकर गुरूजी, डॉ. एन. एस. हर्डीकर, पं. श्रीपाद शास्त्री किंजवडेकर, दुर्गा भागवत, दत्तो वामन पोतदार

डॉ. हरीभाऊ वाकणकर, पद्मभूषण-शालिनीताई मोघे, धर्मसिंधुकार बाबा भट्ट पाध्ये, राजारामशास्त्री भागवत, बाळशास्त्री जांभेकर, ह. रा. महाजनी, प्रभाकर पाध्ये, गोपिनाथ तळवलकर, शंकरराव जावडेकर, ------- सरदेसाई, त्र्यं. शं. शेजवलकर, प्रभाकर पणशीकर,

स्वामी चक्रधर, माधवराव मुळ्ये, रामकृष्ण शंकर ताटके, माधवराव वैद्य, टिकेकर,

४. विचारवंत–स्वामी चक्रधर, त्र्यं. शं. शेजवलकर, दत्तो वामन पोतदार, प्रभाकर पाध्ये, आण्णा टिकेकर, रामकृष्ण शंकर ताटके, गं. दे. आंबेकर, ह. रा. महाजनी, शं. पां. पंडित, शं. द. जावडेकर, पु. ग. मावळकर, माधवराव सप्रे, सरदेसाई, बालाजी तांबे, कुसुम नाटगोळकर, भाऊसाहेब नेवाळकर.

५. आयुर्वेदाचे अभ्यासक –रामकृष्ण हरी भडकमकर, भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, पुरूषोत्तमशास्त्री नानल, बालाजी तांबे, विष्णू कृष्णशास्त्री पुराणिक, दत्तोपंत कृष्णसांडू, ग. कृ. गर्दे, मयुरेश आगटे, नारायण वामन पुरोहित, भि. के. पाध्ये, गुण्ये

६. राजकारणपटू –मोघे, भारतरत्न–गोविंद वल्लभपंत पराडकर, बाळासाहेब खरे, गणेश वासुदेव मावळंकर, शंकरराव देव, कॉम्रेड–श्रीनिवास सरदेसाई, सीमा रामपंत खेर, लक्ष्मीबाई नेवालकर, नारायण कृष्ण शेजवलकर, लक्ष्मण बळवंत भोपटकर, पद्मभूषण वि. सा. सरवटे, आत्माराम गोविंद खेर, प्रकाश जावडेकर.

७. गाणारी–रँग्लर–ग. स. महाजनी, रँग्लर–विष्णुपंत नारळीकर, रँग्लर–जयंत नारळीकर, रँग्लर–अनंत नारळीकर, प्रो. हुजूरबाजारे गो. शं., प्रो. त्र्यं. मि. हर्डीकर, डॉ. श. अ. कात्रे, डॉ. राजेंद्र गुर्जर, डॉ. रमेश टिकेकर

८. मराठी नट/नटी–पद्मश्री दिप्ती भाटवडेकर, प्रभाकर पणशीकर, शरद तळवलकर, श्रीकांत मोघे, रविंद्र महाजनी, भालचंद्र पेंढारकर, इला भाटे, उदय टिकेकर, उत्तरा बावकर, नंदा पातकर, रिमा भडभडे, पल्लवी आठल्ये, भार्गवी चिरमुले, उर्मिला कानेटकर, विष्णू चिंचाळकर, किशोरी –––––––अण्णासाहेब किर्लोस्कर

९.असेंब्ली स्पीकर्स–गणेश वासुदेव मावळंकर, सीमा रामपंत खेर, मुकुंद सखाराम नेवाळकर

१०.चित्रकला, शिल्पकला–माधव श्रीपाद सातवलेकर, गोपाळराव देऊस्कर, गोपाळ गुर्जर, श्रीपाद दामोदर सातवणेकर, तेजस पराडकर, वसंत हळबे, विष्णूपंत चिंचाळकर, रामकृष्ण वामन देऊस्कर, सदानंद बाक्रे, राजेंद्र ढवळे, उपेंद्र आठले, वसंत नवाथे


*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

संस्थावृत्तः

१. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे

दि. ७ ऑगस्ट रोजी श्री. खंडेराव मार्केटजवळ असलेल्या पौराणिक व पवित्र अशा श्री. सिध्दनाथ विठ्ठल मंदिरात सकाळी ९.०० वाजता, नामवंत व पूजनीय श्री. वासुदेव पित्रे गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली, ''श्री सत्यदत्त'' पूजा संपन्न झाली. ७० सभासदांच्या उपस्थितीत यजमान पदावर श्री. श्रीकांत गुर्जर व त्यांच्या पत्नी सौ. प्राची गुर्जर लाभले होते. संस्थेचे सदस्य श्री. सचिन पाध्ये यांनी माफक दरात महाप्रसादाची उत्तम सोय केली होती. दुपारी ३.०० वाजता याच स्थळी ८०-८५ भाविकांच्या उपस्थितीत ''दत्तबावनी'' पाठाची ५२ आवर्तने झाली. त्यानंतर आरती, प्रसाद व अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी काही सभासदांनी देणगी देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

सौ. स्वाती र. बाकरे

कार्यवाह

२. दि. १६-१०-२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता बडोद्यातील एकुलती एक मराठी महाराणी चिमणाबाई हायस्कूल, सलाटवाडा, बडोदा येथे संघाचा वर्धापनदिन साजरा झाला. यानिमित्ताने घेतलेल्या पाक-कला स्पर्धेत १३ महिलांनी पोह्याचे गोड व तिखट पदार्थ सजवून आपले कौशल्य दाखविले. वेगवेगळ्या गटात कलावंतांनी नृत्य व वेशभूषा सादर केली. टाकळकर पॉवर इंजिनियर्स अँड कन्सल्टंट प्रा. लि. कंपनीचे डायरेक्टर श्री. सुभाषचंद्र एम. टाकळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना व विविध शैक्षणिक क्षेत्रांतील प्रवीण विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच १२ जेष्ठ सभासदांचा सन्मान करण्यात आला. १०० वर उपस्थित सभासदांना ''संपर्क'' त्रैमासिकाबद्दल माहिती सांगण्यात आली व काहींनी ताबडतोब सभासदत्व नोंदविले. सुमारे ७.०० वाजता अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

३. विशेष कार्यक्रम

काहीही कारणाने वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वडील मंडळींना काही अशी का होईना. आप्तेष्टांचा ओलावा आणि दिलासा अनुभवल्याचा आनंद मिळावा यासद् हेतूने दि. २४-१०-२०११ रोजी निजामपूरा, बडोदे येथील वृध्दाश्रमात ६५ जणांना ''दिवाळी'' फराळाची पॅकेटस व चॉकलेट वाटण्यात आली. काही मंडळीच्या डोळ्यात आनंदाश्रू सुध्दा दिसले.

आश्रयदाते व विशेष देणगीदार पंडित श्री. दत्तात्रय राजाराम किरकीरे व श्री. विष्णू अनंत महाजन यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला हे विशेष होय.

सौ. स्वाती बाकरे

कार्यवाह.

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

# काटदरे

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

**चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती**

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

# काटदरे फूड प्रोडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!



# फणसळकर
## कोंकण काजू

**उत्पादक :**

कोकण काजू    सांडगी मिरची
फणस–तळलेले गरे    काजूकतली

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१



**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता
हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम.
आय. डी. सी., डोंबिवली (पू.)



बायको गेली माहेरी,
काम करी पितांबरी !
घरातील
स्वच्छतेची उत्पादने !
IMPROVED
Extra Thick
Sanit All
Super Power Sanitary Cleaner
5 in 1
पितांबरी
Super Improved
Pitambari
Klenz
POWERWASH
THICKER
Pitambari
Dishwash Liquid
Rooperi
PITAMBARI
Dishwash Bar
PITAMBARI
Dishwash Jar
AOS
पितांबरी
होमकेअर डिव्हीजन
पितांबरी जार : कमी विरघळे जास्त चाले !
पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., ठाणे -२ (०२२) ६७०३ ५५५५, टोल फ्री क्रमांक -१८००२२४४१८.
www.pitambari.com., ASM : राजेश जाधव (मध्य मुंबई)- ९१६७४९२७०६, संतोष देसाई : ९१६७४९२७२०

*With*

*Best Compliments*

*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,

Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com

Shrikant Sakhalkar 9850130920



**लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व**
**इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरिंग सेवेसह सुसज्ज हॉल**
**...आता वातानुकुलित**




# Nakhye Udyog

## शुभमंगल कार्यालय आणि एव्हरेस्ट हॉल

### शुभमंगल केटरर्स,

एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर,
लोकमान्य चौक, फडके रोड, डोंबिवली (पू.) – ४२१ २०१
फॅक्स : ०२५१-२४८३३५१ फोन : ०२५१-२४३३१९३, ३०९१९००
संपर्क : योगेश – ९३२३१३३१९१

### एव्हरेस्ट केटरर्स,

म. गांधी रोड, डोंबिवली (प.) – ४२१ २०२
फोन : ०२५१-२४९२८६४, ३०९१८९७ फॅक्स : ०२५१-२४८३३५१
संपर्क : उमेश – ९३२२२८३०३८